पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक ५५**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. २७/३/२०१८** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **महात्मा जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा**

**विषय क्र. २४९४**

उप आयुक्त, (परिमंडळ विभाग क्र. ५) चा माहे फेब्रुवारी २०१८ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ यांचे जा.क्र. उआ–५/५४१८ दि. १३/३/२०१८ चे पत्र.

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. २४९५**

मा.सौ.रुपाली धाडवे व मा.सौ.वृषाली चौधरी यांचे दि. २०/३/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. ३७ ब मधील राजा शिवछत्रपती दवाखान्यातील अर्धवट राहिलेले प्रसुतिगृह पूर्ण करणेसाठी र.रू.५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७–२०१८ चे अंदाजपत्रक, यादी क्र.एसजे६, शहरामध्ये नव्याने प्रसुतिगृह / विविध सोयीसुविधा असलेले दवाखाने उभारणे, पान क्र. २२६, अ.क्र. ६२, नविन हॉस्पिटलची उभारणी करणे व सावित्रीबाई नर्सिंग कॉलेज | ५० लाख | --- |
| **नवीन सुचविलेले काम**<br>प्रभाग क्र. ३७ ब मधील राजा शिवछत्रपती दवाखान्यातील अर्धवट राहिलेले प्रसुतिगृह पूर्ण करणे | --- | ५० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**माहितीसाठी आलेले विषय**

**विषय क्र. २४९६**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. ५ यांच्या अखत्यारीतील माहे फेब्रुवारी २०१८ ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे कार्यादेश देण्यात आलेल्या कामाची माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/प.क्र.५/१२३२ दि.१५/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २४९७**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. २/९/२०१७ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. २/९/२०१७ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/१२८९ दि. १५/३/२०१८ ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये ४,००,१९१/– चा तक्ता माहितीसाठी.

**विषय क्र. २४९८**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. ९/९/२०१७ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. ९/९/२०१७ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/१२९० दि. १५/३/२०१८ ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये ४,०२,९३८/– चा तक्ता माहितीसाठी.

**विषय क्र. २४९९**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. १६/९/२०१७ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. १६/९/२०१७ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/१२९१ दि. १५/३/२०१८ ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये ७,१४,९६०/– चा तक्ता माहितीसाठी.

**विषय क्र. २५००**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. २३/९/२०१७ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. २३/९/२०१७ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/१२९२ दि. १५/३/२०१८ ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये ११,७६,८६१/– चा तक्ता माहितीसाठी.

**विषय क्र. २५०१**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. ३०/९/२०१७ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. ३०/९/२०१७ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/१२९३ दि. १५/३/२०१८ ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये १२,०७,३२३/– चा तक्ता माहितीसाठी.

**विषय क्र. २५०२**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. ७/१०/२०१७ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. ७/१०/२०१७ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/१२९४ दि. १५/३/२०१८ ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये १,८०,१५७/– चा तक्ता माहितीसाठी.

**विषय क्र. २५०३**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. १४/१०/२०१७ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि.१४/१०/२०१७ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/१२९५ दि. १५/३/२०१८ ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये ७,६१,६२७/– चा तक्ता माहितीसाठी.

**विषय क्र. २५०४**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. २१/१०/२०१७ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि.२१/१०/२०१७ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/१२९६ दि. १५/३/२०१८ ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये १,५३८/– चा तक्ता माहितीसाठी.

**विषय क्र. २५०५**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. २८/१०/२०१७ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि.२८/१०/२०१७ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/१२९७ दि. १५/३/२०१८ ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये ११,३२,५०१/– चा तक्ता माहितीसाठी.

**सेवकवर्गाची प्रकरणे**

**विषय क्र. २५०६**

श्री.शंकर भिमराव अडागळे, सेवानिवृत्त मुकादम यांचा निलंबन कालावधी सेवाकाळ समजून सदर कालावधीतील सर्व आर्थिक लाभ देण्याबाबत स्थायी समिती, पुणे महानगरपालिका यांनी पारित केलेला ठराव नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी निलंबित केला असून त्यावर मा.स्थायी समितीस अभिवेदन सादर करावयाचे असल्यास ते करणेबाबत महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक पीएमसी–३०१५/प्र.क्र.६१६/नवि–२२ मंत्रालय, मुंबई ४०००३२ दि. २ फेब्रुवारी २०१८ चा शासन निर्णय विचारासाठी

**विषय क्र. २५०७**

लेखापरीक्षण विभागाकडील वरीष्ठ लिपीक(सिनिअर ग्रेड लेखनिक) पदावर नेमणूका करणेसाठी खालील निवडयादीतील शिफारस केलेल्या निवड्यादीतील नेमणूका करण्यासाठी खालील सेवकांचा दिलेला क्रम, मागासवर्गीस अनुशेष व आरक्षण, शासनाकडील वेळोवेळीचे आदेश,रिक्त जागांची उपलब्धता इ. आस्थापनाविषयक बाबीचा विचार करुन मा.सह महापालिका आयुक्त(मुख्य लेखापरीक्षक) यांनी नेमणूका करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३(२) नुसार मान्यता मिळणेबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांचे जा.क्र.मुलेप/१३३८ दि.२१/३/२०१८ चे पत्र.

वरीष्ठ लिपीक(सिनिअर ग्रेड लेखनिक )( पे बॅन्ड रु.५२०० ते २०२००+ ग्रेड पे रु.४१०० +मान्य भत्ते) या संवर्गात नेमणूकीसाठी निवडयादी खालीलप्रमाणे :–

(मनपा प्रशासनाकडून नेमणूक)

| अ. क्र. | सेवकांचे नांव व नेमणूकीचा गट | आवश्यक शैक्षणिक पात्रता | ज्युनि. ग्रेड लेखनिक संवर्गात नेमणूक दिनांक | सिनि. ग्रेड लेखनिक संवर्गात नेमणूक दिनांक | जात वैधता प्रमाणपत्र क्र.दि. |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती विद्या अजय सुपे (अ.ज.) | बी.कॉम. | १७/११/०१ | २६/०२/१० | ०११३२ दि.९/४/०१ |
| २ | श्रीमती केशर कुंदन भंडलकर (वि.जा.अ) | बी.कॉम. | ०६/०३/०४ | २४/०९/१५ | ४३२८६ दि.१७/७/१० |

**सर्वात कमी रकमेचे टेंडर्स**

**विषय क्र. २५०८**

जुना प्रभाग क्र.११ ब व नविन प्रभाग क्र.७ ड जनवाडी गोखलेनगर येथील बी.डी.किल्लेदार मार्केट बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्सपैकी ठेकेदार शुभम कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.१,९४,१८,५१२/- पेक्षा २८.०८% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,३९,६५,७९३=८३ रक्कमेपर्यंत काम करुन घेणेस अधिक निविदा अटी शर्तीतील बाजार भाववाढ सुत्र व विशेष भाववाढ सुत्रांनुसार फरक अदा/कपात करणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/१२५३ दि.२०/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २५०९**

प्रभाग क्र.१९ ब मधील जनता अमृतुल्य भवानी माता मंदिर चौक ते जुना मोटार स्टॅन्ड चौक पर्यंत ट्रिमिक्स काँक्रीटीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.अमित एन्टरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २९,८७,५५९/– पेक्षा ५.३३% कमी) (ठेकेदार यांचे पत्र आ.क्र. पथ/९१९१, दि.१७/१/२०१८) असल्याने त्यांचेकडून र.रु.२८,२८,३२२=१० पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१२८८ दि.२१/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २५१०**

प्रभाग क्र.२७ अग्रवाल कॉलनी, सुजानपार्क व बिबवेवाडी परिसर येथील रस्ते विकसीत करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सनशाईन व्हेंचर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३९,९९,९२३/- पेक्षा १८.९९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३२,३९,९७७=६२ पर्यंत काम करून घेणेस टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/१२८९ दि.२१/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २५११**

वारजे जलशुध्दीकरण केंद्र येथे फिल्टरबेडचे रिग्रेडेशन करणे व इतर तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.डेक्कन एन्टरप्रायजेस यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.९९,९९,३३५/- पेक्षा १.२% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.९८,७९,३४२=९८ रक्कमेपर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांच्याशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु/१२९० दि.२१/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २५१२**

प्रभाग क्र.२ क मधील नियोजित माजी महापौर भारतजी बापु सावंत पाम पार्क येथे सुशोभिकरणाची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.आर.पी.चित्रोडा यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३९,९९,१२२=४० पेक्षा ३१.९३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२७,२२,२०२=६१ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/उद्यान/१२९१ दि.२१/३/२०१८ चे पत्र.

## टेंडर्स न मागविता ५(२)(२) अन्वये प्रकरणे

**विषय क्र. २५१३**

पुणे महानगरपालिकेच्या विविध खात्यातील रेकॉर्ड जतन करणेकामी नायडु हॉस्पिटल आवारातील नव्याने बांधण्यात आलेल्या इमारतीमध्ये Government E-Market मधील प्राप्त दरानुसार गोदरेज या उत्पादक कंपनीकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड प्रकरण ५ संविदा कलम २ (२) नुसार खरेदी करणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भवन/१२४० दि.२०/३/२०१८ चे पत्र.

१) गोदरेज कंपनी ही उत्पादक कंपनी असल्याने मुव्हेबल फाईल स्टोरेज सिस्टीम कॉम्पक्टर ऑफिस फर्निचरसाठी अनामत रक्कम न घेता आवश्यक तो करारनामा करुन र.रुपये २,७६,१८,०१२/- पर्यंत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ड प्रकरण ५ संविदा कलम २ (२) च्या तरतुदीनुसार खरेदी करणेस

२) गोदरेज कंपनी या उत्पादक कंपनीने वरील कामासाठी मागणी केल्याप्रमाणे ५०% ॲडव्हान्स वर्क ऑर्डर सोबत देणेस

## संकिर्ण

**विषय क्र. २५१४**

पर्वती जलकेंद्र ते लष्कर जलकेंद्र २२०० मि.मी. व्यासाची पोलादी जलवाहिनी टाकणेसाठी पाटबंधारे विभागाच्या जागेतून टाकण्यात येणाऱ्या पाईपलाईन जमीन वापरापोटी र.रुपये १७,३९,८२५/- व अनामत रक्कम ३०,००,०००/- एकूण रुपये ४७,३९,८२५/- इतकी रक्कम यादी क्र.PR 1, शहरामध्ये पाणीपुरवठा प्रकल्प अंतर्गत कामे करणे, बजेट कोड ZE16A103/P1-126+ र.रुपये ६० कोटी या उपलब्ध तरतुदीमधून पाटबंधारे विभागाकडे भरणेस व मा.महा.आयुक्त यांच्या विषयपत्रा सोबत जोडलेल्या मसुद्यानुसार पाटबंधारे विभागासोबत करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पापु/१२३५ दि.१७/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २५१५**

पुर्व पीएमटीने बस खरेदीसाठी ओव्हर ड्राफ्टचे माध्यमातुन घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीसाठी पुणे महानगरपालिकेकडून PMPML ला सन २०१७-१८ व २०१८-१९ या वर्षात देय असलेल्या रकमेतून बँक कर्जाची व्याजासहीत थकीत असणारी रक्कम (मुद्दल+व्याज) समायोजित करुन वसूल करणेस, सदरच्या रकमा संबंधित बँकेस आदा करुन पुणे मनपाच्या मुदतठेवी मोकळया करुन घेणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मुले/१२४३ दि.२०/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २५१६**

PMPML संस्थेस सन २०१६-२०१७ या वर्षात वितरीत केलेल्या मोफत/सवलतीचे बसपासपोटी र.रुपये२७,३७,३०,४०५/- देय ठरत आहे. त्यापैकी यापुर्वीच उचल स्वरुपात आदा करण्यात आलेले र.रुपये २० कोटी समायोजित करुन उर्वरित र.रुपये ७,३७,३०,४०५/- PMPML संस्थेस आदा करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मुले/१२४४ दि.२०/३/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २५१७**

सन २०१७-२०१८ चे अंदाजपत्रकामधील पाषाण, पंचवटी ते कोथरुडला जोडणाऱ्या बोगद्याच्या कामाचा प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी या कामाचे प्री व पोस्ट टेंडर ॲक्टीव्हीटीसाठी प्रकल्प व्यवस्थापन तज्ञ सल्लागार म्हणून मे.सी.व्ही.कांड कन्सल्टंट प्रा.लि. यांची नेमणूक करणेस व त्यांचेशी करारनामा करणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र.मआ/मुअ(प्र)/१२५६ दि.२०/३/२०१८ चे पत्र.

१) बोगद्याच्या कामासाठी प्री टेंडर ॲक्टीव्हीटीसाठी पूर्वगणनपत्रक रक्कमेच्या १% व पोस्ट टेंडर ॲक्टीव्हीटीकरीता प्रकल्प खर्चाच्या १.५% यानुसार प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना कन्सल्टंसी फी अदा करणेस

२) सदर कामासाठी मे.सी.व्ही.कांड कन्सल्टंट प्रा.लि. यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करणेस

३) बोगद्याच्या कामासाठी करावयाच्या भुगर्भिय चाचण्यांकरीता तज्ञ सल्लागार यांना दरसुचीनुसार दर अदा करणेस

**विषय क्र. २५१८**

जिल्हास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेच्या आयोजनास व त्याप्रित्यर्थ होणाऱ्या खर्चासाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र.मआ/क्रीवि/१२९२ दि.२१/३/२०१८ चे पत्र.

१) पुणे जिल्हा व्हॉलीबॉल असोसिएशन यांचेमार्फत दि.२३ व २४ मार्च २०१८ या कालावधीत जिल्हास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन करणेस

२) स्पर्धा आयोजना प्रित्यर्थ र.रुपये ६,१३,०००/- पर्यंतचा प्रत्यक्ष होणारा खर्च पुणे जिल्हा व्हॉलीबॉल असोसिएशन यांना आदा करणेस

३) पुणे जिल्हा व्हॉलीबॉल असोसिएशनला मंडप खर्च, विद्युत खर्च,भोजन खर्च पुणे मनपाच्या भवन, विद्युत व नगरसचिव विभागाकडील DRS प्रमाणे तपासून बिले आदा करणेस

४) स्पर्धेसाठी आवश्यक सन्मानचिन्ह, ट्रॉफी व्यवस्था मा.नगरसचिव विभागाकडील पुरवठादार यांच्यामार्फत करणेस

५) पुणे शहराबाहेरुन येणाऱ्या खेळाडू व पंच यांना प्रवास भत्ता र.रुपये ३००/- (संपुर्ण स्पर्धा कालावधीकरीता) आदा करणेस

६) स्पर्धेत विजेयी होणाऱ्या खेळांडूच्या/संघाचे नावे बक्षिसे र.रुपये २,५०,०००/- RTGS द्वारे आदा करणेस

७) तसेच इतर अनुषंगिक खर्च उदा. फ्लेक्स, मैदान दुरुस्ती,रॉयल्टी, क्रीडा साहित्य, स्टेशनरी इत्यादी खर्च आदा करणेस

८) सदरची रक्कम क्रीडा विभागाकडील खाली नमुद केलेल्या अर्थशिर्षकातून खर्च करणेस
सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, (RE27A154), १७- खेळ व क्रीडागंणे, क- पं. नेहरू स्टेडियम, २१- देशी खेळांना प्रोत्साहन देण्याकरीता शिबीरे व स्पर्धा आयोजित करणे रक्कम रू.१८,००,०००/-.

सुनिल पारखी
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)